नि.क्र. ७/क

सरकार तर्फे साक्षीदार क्र.१ ची जबानी
मी या व्दारे सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो कीः

माझे नाव - मारुती बापू मालकर,
वय - ५८ वर्षे,
व्यवसाय - पोलिस पाटील,
राहणार - तळवली, ता. खालापूर, जि. रायगड.

**सरतपास सरकारी वकील श्रीमती पी. टी. बुये यांचे मार्फत शपथेवर सुरु....**

१) दि. १४/०२/२०२४ रोजी मला पोलिस उपनिरीक्षक ढोणे, रसायनी पोलिस स्टेशन यांनी तळवणी गावातील कमानीजवळ बोलवले होते. त्यावेळी पोलिसांनी मला छापा टाकण्यासाठी जायचे आहे असे सांगितले होते. तसेच माझ्या सोबत अजुन एक पंच होता. त्यावेळी माझ्यासोबत पोलिस उपनिरीक्षक ढोणे, कांबळे व भडाळे हे होते. त्यानंतर आम्ही खाजगी मोटरसायकल वरुन फिरत तलावाजवळ गेलो असता आम्हाला एक इसम कॅनसह मिळून आला. पोलिसांनी त्याला पकडले. त्या कॅन मध्ये गावठी हातभट्टीची दारु अंदाजे २० लिटर मिळून आली. त्यानंतर पोलिसांनी त्या दारु मधुन रासायनिक तपासणीसाठी नमुना काढून घेतला. त्यावर आमच्या सह्या घेतल्या. त्या इसमाचे नाव दिलीप चंदर वाघमारे असे होते. त्या ठिकाणी पोलिसांनी पंचनामा केला व आमच्या सह्या घेतल्या. आता मला दाखवण्यात आलेला पंचनामा तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. पंचनाम्यास **निशाणी ८** देण्यात आली. त्या ठिकाणी पोलिसांनी फोटो काढले होते. आता मला दाखवण्यात आलेले फोटो तेच आहेत. फोटोंना **आर्टीकल अ** व **ब** देण्यात आले. सदरचा पंचनामा संध्याकाळी ०७ः३० ते ०८ः१५ या वेळेत झाला. आरोपीला पाहील्यास मी ओळखू शकतो. आरोपी आज न्यायालयात हजर आहे.

**सरतपास संपला.**

**उलटतपास आरोपीचे वकील श्रीमती पी. जे. विटे यांचेमार्फत सुरु...**

२) हे म्हणणे खरे आहे की, मी तळवली गावचा पोलिस पाटील म्हणून काम करतो. मी पोलिस पाटील असल्याबाबतचा पुरावा पोलिसांना तपासादरम्यान दिला होता. हे म्हणणे खरे आहे की, मी पोलिस पाटील असल्यामुळे माझे पोलिस स्टेशनला नेहमी येणे जाणे असते. हे म्हणणे खरे आहे की, मी इतर ब-याच गुन्ह्यांमध्ये पंच म्हणून काम केलेले आहे. पोलिसांनी माझ्यासमक्ष रिकाम्या बाटलीचा स्वतंत्र पंचनामा केला नव्हता. पोलिसांनी माझ्यासमक्ष आरोपीचे आधारकार्ड पाहीले होते. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाच्या आजूबाजुला घरांची वस्ती आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी आदिवासी असल्यामुळे आदिवासी लोक जंगलामध्ये लाकडे वगैरे आणण्यासाठी जात असतात. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास संपला.**

**फेर तपास नाही.**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत.**

Digitally signed by
DIPALI SUBHASH KHOT
Date: 2026.01.02
13:03:22 +0530

**( डी. एस. खोत )**
न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग,
कोर्ट क्र.२, खालापूर.

स्थळ - खालपूर.
दिनांक - ०२/०१/२०२६